# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## बी. एड. २०२५-२६

## छात्र परिषद (Student Council) अहवाल

**समन्वयक**
मा.प्रा.डॉ. प्रियांका सुभेदार

**अध्यक्ष**
मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले

**सचिव**
श्रीमती.शिवानी रामदास डोईफोडे

**सभापती**
श्री. नितीन मधु कवाड

GOVERNMENT COLLEGE OF EDUCATION, PANVEL
STUDENT COUNCIL 2025 - 26



# अनुक्रमाणिका

## अहवाल : छात्र परिषद २०२५-२६

| अ.क्र. | वार | कार्यक्रम |
|---|---|---|
| १. | १५ ऑगस्ट २०२५ | स्वातंत्र्य दिन |
| २. | १० डिसेंबर २०२५ | छात्र परिषद उद्घाटन सोहळा |
| ३. | २६ जानेवारी २०२६ | प्रजासत्ताक दिन |
| ४. | २४ फेब्रुवारी २०२६ | छात्र परिषद सहविचार सभा-१ |
| ५. | ६ मार्च २०२६ ते ११ मार्च २०२६ | वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण सोहळा |
| ६. | १८ एप्रिल २०२६ | छात्र परिषद सहविचार सभा-२ |
| ७. | १ मे २०२६ | महाराष्ट्र दिन व कामगार दिन |

# GOVERNMENT COLLEGE OF EDUCATION, PANVEL

## STUDENT COUNCIL : 2025 - 2026

| Sr. No. | Designation | Name |
|---|---|---|
| 1 | अध्यक्ष<br>( Chairman ) | Dr. Raamaa A. Bhoslay<br>(Principal) |
| 2 | समन्वयक<br>( Coordinator) | Dr. Priyanka P. Subhedar<br>(Professor) |
| 3 | क्रीडा प्रभारी<br>( Sports Incharge ) | Dr. Nilima A. More<br>(Professor) |
| 4 | सभापती<br>( Speaker ) | Mr. Nitin Madhu Kawad |
| 5 | सचिव<br>( Secretary ) | Miss. Shivani Ramdas Doiphode |
| 6 | वर्ग प्रतिनिधी<br>(Class Representative F.Y. B.Ed.) | Miss. Neha Atmaram Lahane |
| 7 | वर्ग प्रतिनिधी<br>(Class Representative S.Y. B.Ed.) | Mr. Rohan Dattatrey Bhoir |
| 8 | वर्ग प्रतिनिधी<br>(Class Representative F.Y. M.Ed.) | Miss. Bharati Rajesh Bugade |
| 9 | वर्ग प्रतिनिधी<br>(Class Representative S.Y. M.Ed.) | Miss. Archana Bhaskar Zaware |
| 10 | महिला प्रतिनिधी<br>(Ladies Representative) | Miss. Vandana Ramnath Vanve |
| 11 | मागासवर्ग प्रतिनिधी<br>(Backward Class Representative) | Miss. Swati Ramkrishna Mhaismale |
| 12 | क्रीडा प्रतिनिधी<br>( Sports Representative ) | Mr. Akash Baburao Rathod |
| 13 | सांस्कृतिक प्रतिनिधी<br>( Cultural Representative) | Miss. Tejal Rajesh Bhoir |
| 14 | राष्ट्रीय छात्रसेना प्रतिनिधी<br>( N.C.C. Representative ) | Miss. Pranoti Mahadeo Kamble |
| 15 | राष्ट्रीय सेवा योजना प्रतिनिधी<br>( N.S.S. Representative ) | Miss. Ruchita Balu Sutar |

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.

## १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन

## अहवाल.

### ध्वजारोहण.

दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी महाविद्यालयामध्ये ७९ व्या भारतीय स्वतंत्रदिनाच्या निमित्ताने सकाळी ठीक ८:०० वाजता महाविद्यालयाच्या प्राचार्य मा.डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रध्वजाला सलामी दिल्यानंतर सर्वांनी राष्ट्रगीत, ध्वजगीत व राज्यगीताचे गायन केले.

### देशभक्तीपर समूहगीत गायन.

महाविद्यालयातील सरस्वती कक्षामध्ये मराठी व हिंदी देशभक्तीपर समूह गीतगायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.. या कार्यक्रमात महाविद्यालयातील बी.एड व्दितीय वर्ष प्रशिक्षणार्थ्यांच्या आंतरवसिता गटाच्या वतीने प्रत्येकी एक देशभक्तीपर गीताचे समूहगायन केले.

### महाविद्यालयाच्या छात्रपरिषदेच्या वतीने राज्यस्तरीय ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धा.

महाविद्यालयाच्या छात्रपरिषदेच्या वतीने भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर आधारित राज्यस्तरीय ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली तसेच यामध्ये महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांनी देखील यात सहभाग नोंदविला.

### विभाजन – विभीषिका स्मृती दिन

महाविद्यालयाच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त विभाजन – एक विभिषिका स्मृतिदिन आयोजित करण्यात आला. यामध्ये नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (NSD) यांच्याव्दारे व्हिडिओ नाटिकेचे सादरीकरण केले गेले. याचे आयोजन प्रा. बिजली दडपे यांनी केले तसेच अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी भूषवले.

# १५ ऑगस्ट २०२५ स्वातंत्र्यदिन क्षणचित्रे.


















# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

# "छात्रपरिषद उद्घाटन सोहळा"

# अहवाल

दिनाांक :- १० डिसेंबर,२०२५

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे अत्यंत उत्साहपुर्ण व शिस्तबद्ध पद्धतीने छात्रपरिषद उद्घाटन सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या प्राचार्य अध्यक्षा मा.डॉ.रमा भोसले आणि सर्व प्राध्यापक वृंद आणि छात्रपरिषद सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन, दीपप्रज्वलाने करण्यात आली. मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते, कार्यक्रमाचे आयोजिका मा.प्रा.डॉ.प्रियांका सुभेदार तसेच सर्व प्राध्यापक वृंदांच्या उपस्थितीत पूजन विधी पार पडला. सरस्वती पूजनानंतर प्राचार्य, सर्व प्राध्यापक वृंद यांचे औपचारिक स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती.स्मितल कुरूप यांनी करून छात्रपरिषद स्थापनेचे महत्त्व, तिची उद्दिष्टे आणि तिच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांचा विकास कसा साधला जाऊ शकतो, याविषयी मार्गदर्शन केले.

त्यानंतर मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते छात्रपरिषद नामफलकाचे अनावरण करण्यात आले. नामफलक अनावरणानंतर नवनिर्वाचित छात्रपरिषद सदस्यांचा अभिनंदन सोहळा आणि शपथविधी पार पडला. सर्व सदस्यांनी छात्रपरिषद पदाची शपथ घेत, आपली जबाबदारी निष्ठेने पार पाडण्याचा संकल्प केला.

तसेच मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी अध्यक्षीय भाषण केले. त्यांनी छात्रपरिषदेच्या भूमिकेवर प्रकाश टाकत, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि सामाजिक बांधिलकी यांचा परिपोष कसा होतो, याविषयी मार्गदर्शन केले. व त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी उपस्थितांना नवीन उत्साह मिळाला.

कार्यक्रमाच्या शेवटी श्रीमती. अनघा म्हात्रे यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी सर्व मान्यवर, प्राध्यापक वृंद, छात्रपरिषद सदस्य आणि विद्यार्थ्यांचे सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विशाल गावित यांनी उत्तम प्रकारे पार पाडले. छात्रपरिषद उद्घाटन सोहळा अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. या सोहळ्यातून विद्यार्थ्यांना नेतृत्व, जबाबदारी आणि संघटन कौशल्य यांची जाणीव झाली. तसेच, नव्या छात्रपरिषद सदस्यांना पुढील कार्यासाठी प्रेरणा मिळाली. संपूर्ण कार्यक्रम उत्तम व्यवस्थापन आणि उत्साही वातावरणात पार पडल्याने उपस्थितांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले.






शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल
(शैक्षणिक वर्ष : २०२५-२६ )

छात्र परिषद उद्घाटन सोहळा

कार्यक्रम पत्रिका

| | |
|---|---|
| सरस्वती पूजन आणि द्वीप प्रज्वलन | मा. प्राचार्य व प्राध्यापक वृंद |
| स्वागत व प्रास्ताविक | श्रीमती.स्मितल कुरूप |
| नाम फलकाचे अनावरण | मा. प्राचार्य यांच्या हस्ते |
| सत्कार / अभिनंदन | छात्रपरिषद |
| शपथविधी | छात्रपरिषद |
| अध्यक्षीय भाषण | मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले |
| आभार | श्रीमती.अनघा म्हात्रे |
| सूत्रसंचालन | श्री. विशाल गावित |

स्थळ : सरस्वती कक्ष

दि. १० डिसेंबर २०२५ वेळ : सकाळी ११:१५

# छायाचित्रे:-




महाविद्यालयाच्या प्राचार्य मा. डॉ. रमा भोसले आणि सर्व प्राध्यापक वृंद सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलन करताना.




कार्यक्रमाच्या समन्वयक मा.प्रा.डॉ. प्रियांका सुभेदार, महाविद्यालयाच्या प्राचार्य व छात्रपरिषदेच्या अध्यक्षा मा. डॉ. रमा भोसले यांचं पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना.




द्वितीय वर्ष छात्राध्यापिका श्रीमती. स्मितल कुरूप "छात्र परिषद उद्घाटन सोहळ्याचे"प्रास्ताविक करताना. आणि नवनिर्वाचित सदस्यांचे शब्दसुमनांनी स्वागत करताना.




महाविद्यालयाच्या प्राचार्य मा. डॉ. रमा भोसले आणि कार्यक्रमाच्या आयोजीका मा.डॉ.प्रियांका सुभेदार नामफलकाचे अनावरण करताना. समवेत सर्व प्राध्यापक वृंद आणि छत्रपरिषदेचे नवनिर्वाचित सदस्य




मा. प्राचार्य डॉ.रमा भोसले यांच्या हस्ते सभापती या पदासाठी नवनिर्वाचित सदस्य प्रथम वर्षीय छात्राध्यापक नितीन कवाड यांचं पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना.




प्रथम वर्षीय छात्राध्यापक नितीन कवाड सभापती या पदासाठी शपथ घेताना.




मा. प्राचार्य डॉ.रमा भोसले यांच्या हस्ते सचिव या पदासाठी नवनिर्वाचित सदस्य प्रथम वर्षीय छात्राध्यापिका शिवानी डोईफोडे यांचं पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना.




प्रथमवर्षीय छात्राध्यापिका शिवानी डोईफोडे सचिव पदासाठी शपथ घेताना.




**प्रथम वर्षीय छात्राध्यापिका नेहा लहाने यांचं वर्ग प्रतिनिधी या पदासाठी मा. डॉ. नीलिमा मोरे पुष्प देऊन अभिनंदन करताना.**




**प्रथम वर्षीय छात्राध्यापिका नेहा लहाने वर्ग प्रतिनिधी या पदासाठी शपथ घेताना.**




**द्वितीय वर्ष छात्राध्यापक रोहन भोईर यांचं वर्ग प्रतिनिधी या पदासाठी मा. डॉ. प्रियांका सुभेदार पुष्प देऊन अभिनंदन करताना.**




**द्वितीय वर्ष छात्राध्यापक रोहन भोईर वर्ग प्रतिनिधी या पदासाठी शपथ घेताना.**




प्रथम वर्षीय छात्राध्यापिका वंदना वणवे यांचं वर्ग महिला प्रतिनिधी या पदासाठी मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे पुष्प देऊन अभिनंदन करताना.




प्रथम वर्षीय छात्राध्यापिका वंदना वणवे महिला प्रतिनिधी या पदासाठी शपथ घेताना.




प्रथम वर्षीय छात्राध्यापिका स्वाती म्हैसमाळे यांचं मागासवर्ग प्रतिनिधी या पदासाठी मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार पुष्प देऊन अभिनंदन करताना.




प्रथम वर्षीय छात्राध्यापिका स्वाती म्हैसमाळे मागासवर्ग प्रतिनिधी या पदासाठी शपथ घेताना.




द्‌वितीय वर्ष छात्राध्यापक आकाश राठोड यांचं क्रीडा प्रतिनिधी या पदासाठी मा. प्राचार्य. डॉ. रमा भोसले पुष्प देऊन अभिनंदन करताना.




द्‌वितीय वर्ष छात्राध्यापक आकाश राठोड क्रीडा प्रतिनिधी या पदासाठी शपथ घेताना.




प्रथम वर्षीय छात्राध्यापिका तेजल भोईर यांच सांस्कृतिक प्रतिनिधी या पदासाठी मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार पुष्प देऊन अभिनंदन करताना.




प्रथम वर्षीय छात्राध्यापिका तेजल भोईर सांस्कृतिक प्रतिनिधी या पदासाठी शपथ घेताना.







प्रथम वर्षीय छात्राध्यापिका प्रणोती कांबळे राष्ट्रीय छात्रसेना प्रतिनिधी या पदासाठी मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे पुष्प देऊन अभिनंदन करताना.

प्रथम वर्षीय छात्राध्यापिका प्रणोती कांबळे "राष्ट्रीय छात्रसेना प्रतिनिधी" या पदासाठी शपथ घेताना.







द्वितीय वर्ष छात्राध्यापिका रुचिता बाळू सुतार यांच राष्ट्रीय सेवा योजना प्रतिनिधी या पदासाठी मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार पुष्प देऊन अभिनंदन करताना.

द्वितीय वर्ष छात्राध्यापिका रुचिता बाळू सुतार राष्ट्रीय सेवा योजना प्रतिनिधी या पदासाठी शपथ घेताना.




महाविद्यालयाच्या प्राचार्या व छात्र परिषदेच्या अध्यक्षा मा. डॉ. रमा भोसले यांनी छात्रपरिषदेच्या भूमिकेवर प्रकाश टाकत, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि सामाजिक बांधिलकी यांचा परिपोष कसा होतो, याविषयी मार्गदर्शन करत नवनिर्वाचित सदस्यांना शुभेच्छा दिल्या.




द्वितीय वर्ष छात्राध्यापिका अनघा म्हात्रे कार्यक्रमाचे आभार प्रकटीकरण करताना.




प्रथम वर्ष छात्राध्यापक विशाल गावित कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन करताना.




प्रथम वर्ष छात्राध्यापक यश पाटील यांनी काढलेली रांगोळी.

# शासकीय अध्यापक महाविद्यालय,पनवेल

## ७७ वा "प्रजासत्ताक दिन" चिरायू होवो.!

## अहवाल

**दिनांक : २६ जानेवारी, २०२६**

भारताचा ७७ वा "प्रजासत्ताक दिन" शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे अत्यंत उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध व राष्ट्रभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला.

### ध्वजारोहण

महाविद्यालयाच्या सन्माननीय प्राचार्य डॉ.रमा भोसले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर प्रथम व द्वितीय वर्षातील छात्राध्यापकांनी सामूहिकरित्या राष्ट्रगीत,ध्वजगीत, राज्यगीताचे सामूहिक गायन केले.तसेच संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करून प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले.

### देशभक्तीपर समूहगीत गायन

महाविद्यालयातील सरस्वती कक्षामध्ये "देशभक्तीपर समूह गीतगायन” कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयातील बी.एड प्रर्थम वर्ष व द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थ्यांनी देशभक्तीपर गीताचे समूहगायन केले.या स्पधेतून प्रर्थम, द्वितीय, तृतीय असे क्रमांक काढण्यात आले.

### अध्यक्षीय भाषण

महाविद्यालयाच्या प्राचार्य.डॉ. रमा भोसले यांनी ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त अध्यक्षीय भाषण केले.या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद, कार्यालयीन कर्मचारी, प्रथम व द्वितीय वर्षाचे छात्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांमध्ये राष्ट्रप्रेम, राष्ट्रनिष्ठा आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण झाली. सदर कार्यक्रम छात्र परिषदेच्या समन्वयक मा प्रा. डॉ. सुभेदार पी. पी. यांच्या मार्गदर्शनानुसार संपूर्ण वेळेत शिस्त, शांतता व उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला

## छायाचित्रे:-











महाविद्यालयाच्या प्राचार्य मा. डॉ. रमा भोसले ध्वजारोहण करताना.




महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रमा भोसले, सर्व प्राध्यापिका वृंद, कार्यालयीन कर्मचारी ध्वजाला मानवंदना देताना.




प्रथम व द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थी राष्ट्रगीत आणि ध्वजाला मानवंदना देताना.




संविधानातील प्रास्ताविकेचे वाचन करताना प्रथम व द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थी







प्रथम वर्षीय छात्र अध्यापक व छात्राध्यापिका देशभक्तीपर गीताचे गायन करताना







द्वितीय वर्ष छात्राध्यापक व छात्राध्यापिका देशभक्तीपर गीताचे गायन करताना




महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रमा भोसले
अध्यक्षीय भाषण करताना

# शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल

## छात्र परिषद सहविचार सभा वृत्तांत -दिनांक 24/2/2026

दिनांक 24/2/2026 रोजी महाविद्यालयाच्या सेमिनार कक्षामध्ये दुपारी 4.00 वाजता छात्र परिषद सहविचार सभेचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉक्टर रमा भोसले यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आलेले होते. या सभेमध्ये खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.

1) शैक्षणिक वर्ष ( 2025-26) मधील वार्षिक स्नेहसंमेलन आयोजनाच्या तारखा निश्चित करणेबाबत.
2) वार्षिक स्नेहसंमेलनासाठी समित्या व कार्य विभागणी करणेबाबत.
3) स्नेहसंमेलनासाठी पाहुणे निश्चिती करणेबाबत
4) ऐनवेळचे विषय

सभेची सुरुवात प्रा.डॉ. प्रियांका सुभेदार यांनी केली. यावेळी सर्व उपस्थित सदस्यांचे शाब्दिक स्वागत त्यांनी केले . मा. प्राचार्यांनी छात्र परिषदेचे कार्य कसे चालते याविषयी मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील विविध समित्यांच्या जबाबदाऱ्या विविध विद्यार्थ्यांना दिल्या जातात. आपल्या महाविद्यालयात विविध समित्या कार्यरत आहेत. या समित्यांच्या जबाबदाऱ्या विभागून दिलेल्या असतात. छात्र परिषदेत मार्फत 15 ऑगस्ट, 26 जानेवारी, 1 मे हे राष्ट्रीय दिन आणि वार्षिक स्नेहसंमेलन हे साजरे केले जाते. वार्षिक स्नेहसंमेलनाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे क्रीडा स्पर्धा. क्रीडा स्पर्धांचे आयोजन क्रीडा विभाग प्रमुख डॉ. मोरे एन. ए. यांनी करावे असे मा. प्राचार्यांनी सुचित केले. सांघिक स्पर्धा यामध्ये खो-खो हॉलीबॉल, कबड्डी इत्यादी खेळांचे आयोजन करावे तसेच इन डोअर मध्ये चेस, कॅरम इत्यादी खेळांचे आयोजन करावे असे मा. प्राचार्यांनी सुचित केले. खेळ कोणते घ्यायचे आहेत आणि त्याची वेळ या सगळ्या गोष्टी विद्यार्थ्यांनी ठरवाव्यात. 6 व 7 मार्च रोजी क्रीडा स्पर्धा घेण्याचे निश्चित करण्यात आले. 9 मार्च 2026 रोजी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात यावा व त्याचे आयोजन डॉ. मोरे एन. ए. यांनी करावे असे मा. प्राचार्यांनी सुचित केले.

आनंदमेळा यामध्ये फनी गेम्स व खाद्यपदार्थांचे स्टॉल असतील. ते साहित्य विद्यार्थ्यांनी घरून तयार करून आणायचे आहे. आनंदमेळा व स्नेहभोजन हे विभाग डॉ .उज्वला डोणे यांच्याकडे देण्याचे ठरले.सकाळी 11 ते 1 या वेळामध्ये आनंदमेळा होईल. आनंद मेळावा यानंतर दुपारी 3 ते 5 या वेळेमध्ये मेहंदी स्पर्धा, डिश डेकोरेशन आणि फ्लॉवर डेकोरेशन याचे आयोजन करण्यात यावे असे मा. प्राचार्यांनी सुचित केले. आणि ते सर्वानुमते मान्य करण्यात आले.

11 मार्च 2026 रोजी पारितोषिक वितरण सोहळा आयोजित करण्यात यावा असे मा. प्राचार्यांनी सुचित केले त्यासाठी मा. श्री.प्रशांत डोंगरे सर सहाय्यक संचालक, व्यावसायिक विभाग यांचे नाव सुचित करण्यात आले. त्याला सर्वांनी अनुमोदन दिले. तसेच पारितोषिक वितरण सोहळ्याच्या दिवशी सकाळी दहा वाजता सामूहिक फोटोचे आयोजन करण्यात यावे असे मा. प्राचार्यांनी सुचित केले. सामूहिक फोटो व पारितोषिक वितरण सोहळा या दोन्ही बाबींचे आयोजन डॉ सुभेदार पी. पी. यांनी करावे असे मा.प्राचार्यांनी सुचित केले. प्रत्येक समितीमध्ये छात्र परिषदेचे विद्यार्थी असतील व अन्य विद्यार्थी त्यांच्या समावेत असतील असे मा. प्राचार्यांनी सुचित केले

**1.स्वागत समिती:-** श्री. नितीन कवाड, श्रीम. शिवानी डोईफोडे, श्री.आकाश राठोड , श्री महेंद्र वाघ श्री आकाश पारधी

**2.सामूहिक फोटो:-** श्री. रोहन भोईर, श्री. आकाश राठोड श्री. निमिष जाधव, श्री. दत्ता झुगरे, श्री सुनील चौधरी, श्री. निखिल गावित

**3.क्रीडा समिती:-** श्री आकाश राठोड श्रीम. रुचिता सुतार

**4.सांस्कृतिक समिती:-** श्रीम. तेजल भोईर श्रीम. स्वाती म्हैसमाळे श्रीम. तनुश्री आठवले, श्री. विशाल गावित

**5.आनंद मेळावा:-** श्रीम. वंदना वनवे, श्रीम. नेहा लहाने सविचार

**6.स्नेहभोजन समिती:-** श्रीम. प्रणोती कांबळे, श्रीम. स्वाती म्हैसमाळे, श्रीम. कार्तिकी सोनटक्के, श्रीम. रश्मी नाडकर्णी, श्रीम.शोभा भांगे

तसेच खालील स्पर्धांचे आयोजन करण्यासंबंधी मा. प्राचार्यांनी सुचित केले

(i) मेहंदी स्पर्धा:- मार्गदर्शक प्राध्यापक- डॉ. सुभेदार पी.पी.

(ii) फ्लॉवर डेकोरेशन:- मार्गदर्शक प्राध्यापक -डॉ.मोरे एन.ए.

(iii) डिश डेकोरेशन:- मार्गदर्शक प्राध्यापक – डॉ.डोणे यु. एम .

वरील प्रमाणे स्नेहसंमेलनाची कार्य विभागणी झाल्यानंतर प्रा .डॉ.सुभेदार पी.पी. यांनी उत्तम मार्गदर्शन केल्याबद्दल मा. प्राचार्या डॉ. रमा भोसले यांचे आभार मानले आणि सर्वांचे आभार मानले. आणि मा. प्राचार्यांच्या संमतीने सभा समाप्त करण्यात आली.

RBhosle

प्राचार्य

शासकीय अध्यापक महाविद्यालय, (सी.टी.ई.)

पनवेल, जि. रायगड - ४१० २०६.

महाराष्ट्र शासन

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

मुंबई पुणे जुना हायवे, एस. टी. स्टँडजवळ, पनवेल जि. रायगड – ४१०२०६

E mail: govt_bedcollege@rediffmail.com
Website: www.panvelbedcollege.org

Phone No. 022-27453000 Fax No. 022-27453000


जा.क्र./शाअमप/आस्था/२०२५-२६/ दिनांक : २४/०२/२०२६

## Student Council

| Sr. No. | Name of the member | Designation | Sign. |
|---|---|---|---|
| 1 | Dr. Raamaa A. Bhoslay (Principal) | (Chairman) | RBhoslay |
| 2 | Dr. Priyanka Subhedar (Professor) | (Coordinator) | [signature] |
| 3 | Dr. Nilima A. More (Professor) | (Sports In charge) | NMore |
| 4 | Shri. Nitin Madhu Kawad | (Speaker) | [signature] |
| 5 | Shri. Shivani Ramdas Doifode | (Secretary) | Doiphode |
| 7 | Smt. Neha Atmaram Lahane | (Class Representative of F.Y. B.Ed.) | Nthane |
| 8 | Shri. Rohan Dattarey Bhoir | (Class Representative of S.Y. B.Ed.) | RBhoir |
| 9 | Smt. Bharati Rajesh Bugade | (Class Representative of F.Y. M.Ed.) | |
| 10 | Smt. Archana Bhaskar Zaware | (Class Representative of S.Y. M.Ed.) | |
| 10 | Smt. Vandana Ramdas Vanve | (Ladies Representative) | [signature] |
| 11 | Smt. Swati Ramkrishna Mhaismale | (Backward Class Representative) | [signature] |
| 12 | Shri. Akash Baburao Rathod | (Sports Representative) | ARathod |
| 13 | Smt. Tejal Rajesh Bhoir | (Cultural Representative) | TBhoir |
| 14 | Smt. Pranoti Mahadeo Kamble | (N.C.C. Representative) | PKamble |
| 15 | Smt. Ruchita Balu Sutar | (N.S.S. Representative) | Sutar |
| 16 | Dr. V. M. Done. | | [signature] 24/2/26 |

## छात्र परिषद सहविचार सभा-१  क्षणचित्रे:






# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.

## अहवाल:- वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण सोहळा

## क्रीडा स्पर्धा

दि. ०६ मार्च २०२६ व दि. ०७ मार्च २०२६ रोजी महाविद्यालयात विविध क्रीडा स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेचा उद्देश छात्राध्यापकांच्या शारीरिक व मानसिक विकासाला चालना देणे हा होता. त्यामध्ये वैयक्तिक खेळ (बुद्धिबळ, कॅरम, १०० मीटर व २०० मीटर शर्यत, रिले, गोळाफेक, भालाफेक, थाळीफेक) तसेच सांघिक खेळ (क्रिकेट, कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल) यांसारख्या खेळांचा समावेश होता. सर्व छात्राध्यापकांनी मोठ्या उत्साहाने आणि क्रीडा स्पर्धेच्या नियमांचे पालन करत सहभाग घेतला. हा विभाग छात्रपरिषदेच्या क्रीडा प्रभारी मा. प्राध्यापक डॉ. नीलिमा मोरे यांनी सांभाळला.

### क्षणचित्रे :- क्रीडा महोत्सव




मार्गदर्शन करताना मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले




क्रीडेची शपथ घेताना सर्व छात्राध्यापक




कॅरम स्पर्धा अंतिम सामना




कबड्डी स्पर्धा अंतिम सामना

## सांस्कृतिक कार्यक्रम

दि.०९ मार्च २०२६ रोजी महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. छात्राध्यापकांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि सांस्कृतिक परंपरा जपल्या जाव्यात, या उद्देशाने वार्षिक सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवात विविध कलात्मक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात छात्राध्यापकांनी विशेषतः महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृती वर आधारित नृत्य, गायन, लोकनृत्य, समूहगीत गायन यांसारख्या विविध कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला. हा सांस्कृतिक महोत्सव छात्राध्यापकांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरला. छात्राध्यापकांचे कलागुण, आत्मविश्वास आणि सादरीकरण कौशल्य अधिक बळकट झाले. हा विभाग मा. प्राध्यापिका डॉ. नीलिमा मोरे यांनी सांभाळला.

### सांस्कृतिक कार्यक्रम:




**कोळी नृत्य**




**गोंधळ नृत्य**




**मराठी शाळेवर आधारित नृत्य**




**मंगळागौर**

# <u>आनंद मेळावा</u>

दि. १० मार्च २०२६ रोजी महाविद्यालयात “आनंद मेळावा” उत्साहात आयोजित करण्यात आला. छात्राध्यापकांच्या कलागुणांना वाव मिळावा हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. या मेळाव्यामध्ये( संगीत खुर्ची, मटका फोडणे) स्पर्धा यांसारखे विविध खेळ व स्पर्धा आयोजित करण्यात आले. सर्व प्राध्यापकांनी आणि छात्राध्यापकांनी आनंद मेळाव्याचा खूप आनंद घेतला. हा विभाग प्रा. डॉ. उज्ज्वला डोणे यांनी सांभाळला.

## <u>आनंद मेळावा क्षणचित्रे:</u>












# मेहंदी स्पर्धा

दि. १० मार्च २०२६ रोजी, दुपारी २.३० वाजता महाविद्यालयात “मेहंदी स्पर्धा” उत्साहात आयोजित करण्यात आली. छात्राध्यापकांच्या कलागुणांना वाव मिळावा हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.सर्व प्राध्यापकांनी आणि छात्राध्यापकांनी यांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला आणि हा विभाग प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार यांनी सांभाळला.


## मेहंदी स्पर्धा क्षणचित्रे













# <u>डिश डेकोरेशन</u>

दि. १० मार्च २०२६ रोजी, दुपारी २.३० वाजता महाविद्यालयात “डिश डेकोरेशन स्पर्धा” उत्साहात आयोजित करण्यात आली. छात्राध्यापकांच्या कलागुणांना वाव मिळावा हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. सर्व प्राध्यापकांनी आणि छात्राध्यापकांनी यांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला आणि हा विभाग प्रा. डॉ. उज्ज्वला डोणे यांनी सांभाळला.


## <u>डिश डेकोरेशन क्षणचित्रे:</u>









# वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण सोहळा

## वार्षिक स्नेहसंमेलन:

महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक 5-3-2026 ते 11 -3-2026 या कालावधीत संपन्न झाले. यात प्रथम व द्वितीय वर्ष छात्र अध्यापकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यामध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धा, बौद्धिक स्पर्धा, विविध गुणदर्शन, आनंद मेळावा आणि पारितोषिक वितरण कार्यक्रम यांचा समावेश होता. पारितोषिक वितरण कार्यक्रम मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.या सोहळ्याचे प्रमुख अतिथी माननीय **श्री. प्रशांत डोंगरे (सहाय्यक संचालक व्यावसायिक विभाग), मा. श्री श्रीकांत ठाकूर (व्हाईस चेअरमन,पांडुरंग चांगु पाटील माध्य. विद्यालय चाणजे ,उरण), मा. श्री. सुधाकर पाटील (माजी अध्यक्ष समाज प्रबोधन शिक्षण संस्था, उरण), मा. श्री सुरेश गावंड ( कार्याध्यक्ष, माजी विद्यार्थी संघ शा.अ.म. पनवेल)** हे होते. या सर्व प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन केले.हा विभाग प्राध्यापक डॉ. पी.पी.सुभेदार यांनी सांभाळला.

## पारितोषिक वितरण सोहळा

दिनांक: 11 मार्च 2026 रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय,पनवेल येथे पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. छात्र अध्यापकांना त्यांच्या मेहनती बद्दल गौरव प्रदान करणे आणि त्यांना पुढील यशासाठी प्रेरित करणे हा या सोहळ्याचा हेतू होता. या सोहळ्यात शैक्षणिक, क्रीडा,सांस्कृतिक आणि विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या छात्र अध्यापकांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. छात्र परिषदेचे सभापती श्री. नितीन कवाड यांनी संपूर्ण शैक्षणिक वर्षाचे अहवाल वाचन केले.या सोहळ्याचे प्रमुख अतिथी माननीय **श्री. प्रशांत डोंगरे (सहाय्यक संचालक व्यावसायिक विभाग), मा. श्री. श्रीकांत ठाकूर (व्हाईस चेअरमन, पांडुरंग चांगु पाटील माध्य. विद्यालय चाणजे, उरण) , मा. श्री. सुधाकर पाटील (माजी अध्यक्ष समाज प्रबोधन शिक्षण संस्था, उरण), मा. श्री सुरेश गावंड (कार्याध्यक्ष, माजी विद्यार्थी संघ शा.अ.म. पनवेल)** हे होते. या सर्व प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन केले.

छात्र परिषदेच्या व कार्यक्रमाच्या अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन छात्र अध्यापिका श्रीम.शिवानी डोईफोडे यांनी उत्कृष्टपणे केले. वार्षिक स्नेहसंमेलनाचा सर्व कार्यक्रम छात्र परिषदेमार्फत यशस्वी करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती.तनुश्री आठवले यांनी केले. हा विभाग छात्र परिषदेचे समन्वयक मा. प्रा. डॉ. पी.पी.सुभेदार यांनी सांभाळला.

# क्षणचित्रे : वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण सोहळा




पाहुण्यांचे औक्षण




सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन




स्वागतगीत गाताना प्रथम वर्षाचे विद्यार्थी




प्रास्ताविक करताना प्रा.डॉ.प्रियंका सुभेदार मॅडम




सूत्रसंचालन करताना छात्र अध्यापिका श्रीम. तनुश्री




मा. श्री. सुधाकर पाटील सर यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम




अहवाल वाचन करताना छात्र परिषद सभापती श्री. नितीन कवाड




पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण




मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे मा.श्री. प्रशांत डोंगरे




मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे मा.श्री. श्रीकांत ठाकूर




अतिथी मार्गदर्शन करताना मा.श्री.सरेश गावंड सर




अध्यक्षीय भाषण करताना मा.प्राचार्य.डॉ.रमा भोसले




आभार प्रदर्शन करताना छात्र अध्यापिका शिवानी

# शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल

## छात्र परिषद सहविचार सभा वृत्तांत - दिनांक 16/4/2026

दिनांक 16/4/2026 रोजी प्राचार्य कक्षामध्ये सकाळी 11.00 वाजता छात्रपरिषद सहविचार सभेचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आलेले होते. या सभेमध्ये खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.

1) 1 मे 2026 महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या आयोजनाबाबत
2) ऐनवेळचे विषय

सभेची सुरुवात प्रा.डॉ. प्रियांका सुभेदार यांनी केली. यावेळी सर्व उपस्थित सदस्यांचे शाब्दिक स्वागत त्यांनी केले . छात्र परिषदेने वर्षभरातील सर्व ऍक्टिव्हिटी व स्नेहसंमेलन यशस्वी रीतीने पार पाडल्याबद्दल मा. प्राचार्यांनी छात्र परिषदेच्या अभिनंदनचा ठराव मांडला व तो सर्वानुमते करण्यात आला . सुट्टीच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांनी विविध कोर्सेस करावेत असे मा. प्राचार्यांनी सुचित केले. तसेच इंग्लिश विषय चांगला झाला तर त्याचा फायदा होईल. म्हणून सर्व विद्यार्थ्यांनी निर्धार करून इंग्लिश स्पीकिंग चा कोर्स पूर्ण करावा. असे मा. प्राचार्यांनी सुचित केले.

1मे हा राष्ट्रीय दिन उत्साहामध्ये साजरा करावा. त्या दिवशी झेंडावंदनानंतर समूहगीत कार्यक्रम होईल. त्यामध्ये देशभक्तीपर गीतांचे गायन होईल असे मा. प्राचार्यांनी सुचित केले.

पुढील वर्षी छात्र परिषदेच्या तीन सहविचार सभा घेण्यात याव्यात. जर 1 जुलै 2026 पर्यंत छात्रसेवा काल सुरू केला तर छात्रसेवाकाल योग्य प्रकारे पूर्ण होईल. यामध्ये चार दिवस शाळेत तर दोन दिवस महाविद्यालयात याप्रमाणे छात्र अध्यापक उपस्थित राहतील. विद्यापीठ परीक्षेच्या वेळेला आठ दिवस स्टडी लिव्ह असेल. बाकीच्या वेळापत्रकाविषयी सविस्तर माहिती डॉ. उज्वला डोणे सांगतील. तसेच बी.एड. मध्ये प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थी मल्टी टास्किंग चे कौशल्य शिकतो असे मा. प्राचार्यांनी सुचित केले. अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्ष यामध्ये विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून श्रीमती अनघा म्हात्रे यांचे नाव शैक्षणिक वर्ष 2025 -26) मध्ये समाविष्ट करण्यात आलेले होते परंतु द्वितीय वर्षाचा सदिच्छा समारंभ झालेला आहे. त्यामुळे अनघा म्हात्रे यांच्या ऐवजी श्रीम. तेजल भोईर यांचे नाव समाविष्ट करण्याचे सर्वानुमते मान्य करण्यात आले.

त्यानंतर छात्र परिषदेचे सभापती श्री नितीन कवाड याने सभेला उत्तम प्रकारे मार्गदर्शन केल्याबद्दल मां.प्राचार्य डॉ भोसले यांचे आभार मानले. तसेच उर्वरित सर्व सदस्यांचे आभार मानले. अशाप्रकारे मा. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली छात्र परिषदेचे सहविचार सभा संपन्न झाली.

RBhosle

प्राचार्य
शासकीय अध्यापक महाविद्यालय, (सी.टी.ई.)
पनवेल, जि. रायगड - ४१० २०६.

## GOVERNMENT COLLEGE OF EDUCATION, PANVEL

### STUDENT COUNCIL :- 2025 -2026

### Meeting Attendance Date - 18 /4/2026

| Sr. No. | Name | Designation | Signature |
|---|---|---|---|
| 1 | Dr. Raamaa A. Bhoslay | Chairman | |
| 2 | Dr. Priyanka P. Subhedar | Coordinator | |
| 3 | Dr. Nilima A. More | Sports In charge | |
| 4 | Mr. Nitin Madhu Kawad | Speaker | |
| 5 | Miss. Shivani Ramdas Doiphode | Secretary | |
| 6 | Miss. Neha Atmaram Lahane | Class Representative F.Y. B.Ed. | |
| 7 | Mr. Rohan Dattatrey Bhoir | Class Representative S.Y. B.Ed.) | |
| 8 | Mrs. Bharati Rajesh Bugade | Class Representative F.Y. M.Ed. | |
| 9 | Mrs. Archana Bhaskar Zaware | Class Representative S.Y. M.Ed. | |
| 10 | Miss. Vandana Ramnath Vanve | (Ladies Representative) | |
| 11 | Miss. Swati Ramkrishna Mhaismale | Backward Class Representative | |
| 12 | Mr. Akash Baburao Rathod | Sports Representative | |
| 13 | Miss. Tejal Rajesh Bhoir | Cultural Representative) | |
| 14 | Miss. Pranoti Mahadeo Kamble | ( N.C.C. Representative | |
| 15 | Miss. Ruchita Balu Sutar | N.S.S. Representative | |

**छात्र परिषद सहविचार सभा -०२ क्षणचित्रे**









# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## महाराष्ट्र दिन व कामगार दिन

## अहवाल

दिनांक:०१ मे,२०२६

"०१ मे महाराष्ट्र व कामगार दिन" शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे अत्यंत उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध व राष्ट्रभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला.

### ध्वजारोहण :

महाविद्यालयाच्या सन्माननीय प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर प्रथम वर्षातील छात्राध्यापकांनी सामूहिकरित्या राष्ट्रगीत, ध्वजगीत, राज्यगीताचे सामूहिक गायन केले.

### देशभक्तीपर गीताचे समूहगायन :

महाविद्यालयातील सरस्वती कक्षामध्ये देशभक्तीपर समूह गीताचे आयोजन करण्यात आले सदर कार्यक्रम छात्र परिषदेच्या समन्वयक मा प्रा. डॉ. सुभेदार पी. पी. यांच्या मार्गदर्शनानुसार संपूर्ण वेळेत शिस्त, शांतता व उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला.

### क्षणचित्रे:







